# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५९ वी बैठक दिनांक १२ जून २००९

## ठराव

मा. ना. रामराजे नाईक-निंबाळकर, मंत्री, जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ) व अध्यक्ष, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ यांच्या अध्यक्षतेखाली नियामक मंडळाची ५९ वी बैठक दि. १२ जून २००९ रोजी जलसंपदा विभागाचे परिषद सभागृह,मंत्रालय, मुंबई येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य, सदस्यांचे प्रतिनिधी व निमंत्रित उपस्थित होते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा. ना. रामराजे नाईक निंबाळकर | ... | मंत्री, जलसंपदा (कृखोपाम) व अध्यक्ष |
| २. | मा. श्री. आनंदराव पाटील | ... | उपाध्यक्ष |
| ३. | मा. श्री. सुनिल सोनी | ... | प्रधान सचिव (नियोजन) |
| ४. | मा. इं. व्यं. वि. गायकवाड | ... | सचिव (जसं) व सदस्य |
| ५. | मा. इं. ए. बा. पाटील | ... | सचिव (लाक्षेवि) व सदस्य |
| ६. | इं. ह. य. कोळवले | ... | कार्यकारी संचालक व सदस्य सचिव |

**नियामक मंडळाच्या सदस्यांचे प्रतिनिधी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री. चं. स. केंगले, उपसचिव | ... | प्रधान सचिव (वित्त) व सदस्य यांचे प्रतिनिधी |

**निमंत्रित अधिकारी**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | इं. सु. ल. पाटील | ... | मुख्य अभियंता (जसं), पुणे |
| २. | इं. शि. मा. उपासे | ... | मुख्य अभियंता (विप्र), पुणे |
| २. | इं. रा. वा. पानसे | ... | मुख्य लेखा व वित्त अधिकारी (मकृखोविम) (अ.का.) |

सदर बैठकीत विषयवार चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यांत आले.

**"मान्य"**

**कार्यकारी संचालक**
**म.कृ.खो.वि.म, पुणे**

**मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)**
**व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे**

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५९ वी बैठक दिनांक १२ जून २००९

ठराव क्र. ५९/१

"ठराव करण्यांत येतो की, नियामक मंडळाच्या ५८ व्या बैठकीत पारित झालेले ठराव कायम करण्यात येत आहेत."

ठराव क्र.५९/२

"ठराव करण्यांत येतो की, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या सन २००६-०७ या वर्षाच्या लेख्यांचे लेखापरिक्षणानंतर महालेखापाल, मुंबई यांनी निर्गमित केलेला अलग लेखापरिक्षण अहवाल (S.A.R.) अनुपालनासह विधानमंडळासमोर सादर करण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र.५९/३

"ठराव करण्यात येतो की, श्री. ज्ञा.द. शिंदे, वकील, यांची महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या कायदे सल्लागार पदी दिनांक १/९/२००७ ते ३१/८/२००८ पर्यंत नियुक्ती केलेली आहे. सदर नियुक्तीस दिनांक १/९/२००८ ते ३१/८/२००९ पर्यंत पूर्वीच्याच अटी, शर्ती व ठोक रकमी सल्ला शुल्क अदा करणेच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे."

ठराव क्र. ५९/४

"ठराव करण्यांत येतो की, मौजे उरुळी कांचन येथील १ आर जमिन भविष्यात महामंडळास लागणार नसल्याने, सदर अतिरिक्त जमिनीची प्रचलित शासकीय दराने येणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, पुणे यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे."

ठराव क्र. ५९/५

"ठराव करण्यात येतो की, कुडाळी प्रकल्पांतर्गत हातगेघर धरणाच्या जलमग्न होणाऱ्या क्षेत्रातील गांवठाण मौजे कावडी, ता.जावली, जि. सातारा, येथील एक घर व महू धरणाच्या जलमग्न होणाऱ्या क्षेत्रातील मौजे रांजणी, ता. जावली, जि.सातारा, येथील आठ घरे व नऊ विहीरींची नुकसान भरपाई /मोबदला रक्कम रुपये १७,५२,३३१/- (रुपये सतरा लक्ष बावन्न हजार तीनशे एकतीस फक्त) संबंधितांना अदा करण्यास नियामक मंडळाची कार्योतर मान्यता देण्यात येत आहे."

"मान्य"

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे

# महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे-११

## नियामक मंडळाची ५९ वी बैठक दिनांक १२ जून २००९

ठराव ५९/६

**"ठराव करण्यात येतो की, निरा देवघर जलविद्युत प्रकल्पासाठी मौजे साळव, ता.भोर, जि.पुणे येथील सर्वे १०७ मधील धरणाच्या खालील बाजूस विद्युतगृहाच्या दक्षिणेस महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस ३३/११ के.व्ही.सबस्टेशन व कळयंत्र आवार उभारणेसाठी महामंडळाच्या ताब्यातील ७५ X ७० मी. (५२५० चौ.मी.) मोकळी जागा रु. १०,०००/- एवढ्या वार्षिक भाडेपट्टयाने (वार्षिक भाडेपट्टयात दरवर्षी १० टके वाढ करुन) महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीस ३० वर्षाच्या भाडेकराराने देण्यास नियामक मंडळाची मान्यता देण्यांत येत आहे."**

ठराव क्र.५९/७

**"ठराव करण्यात येतो की, वारणा प्रकल्पाच्या कोकरुड वसाहतीकरिता मौजे कोकरुड, ता.शिराळा, जि.सांगली हद्दीतील संपादित करण्यात आलेल्या जमिनीपैकी ५.१७ हेक्टर क्षेत्र विनावापर आहे. सदर ५.१७ हेक्टर क्षेत्राची वारणा प्रकल्पाकरिता भविष्यात आवश्यकता नसल्याने, सदर जमिनीची शासकीय दराने होणारी किंमत महामंडळास मिळण्याच्या अटीवर जिल्हाधिकारी, सांगली, यांचेकडे वर्ग करण्यास नियामक मंडळाची मान्यता देणेत येत आहे."**

ठराव क्र. ५९/८

**"उरमोडी प्रकल्पाची विश्वासार्हता ७५ टक्के इतकी सुधारण्यासाठी तसेच उरमोडी प्रकल्पातंर्गत नियोजित टप्पा क्र.१ उपसा योजना वगळून त्या क्षेत्रास प्रवाही पध्दतीने पाणी देणे व विजेवरील खर्च कायम स्वरुपी कमी करण्यासाठी आंबळे पूरक जलाशय (ता.सातारा) ही योजना उरमोडी प्रकल्पाचा भाग म्हणून समावेश करण्यास उरमोडी प्रकल्पास वेगवर्धित सिंचनलाभ कार्यक्रमांतर्गत केंद्रीय अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या अटीवर नियामक मंडळाची तत्वतः मान्यता देण्यात येत आहे."**

ठराव क्र. ५९/९

**''ठराव करण्यांत येतो की, सन २००६-०७ च्या अकराव्या वार्षिक अहवालास मान्यता देणेत येत आहे. तसेच हा अहवाल शासनामार्फत विधीमंडळास सादर करण्याच्या कार्यवाहीस नियामक मंडळाची मान्यता देण्यात येत आहे''.**

तदनंतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने कार्यकारी संचालक व सदस्य सचिवांनी मा. अध्यक्ष, मा. उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य व उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाल्याचे जाहीर केले.

**"मान्य"**

कार्यकारी संचालक
म.कृ.खो.वि.म, पुणे

मा.मंत्री, जलसंपदा (कृ.खो.पा.म.)
व अध्यक्ष, म.कृ.खो.वि.म. पुणे